6 मार्च रोजी मुल तालुका, जिवती, बल्लारपुर शहरात विविध विकासकामांचे लोकार्पण व भुमिपुजन

अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा विकासकामांचा झंझावात

राज्याचे अर्थ, नियोजन व वनमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने मंजुर मुल तालुका आणि बल्लारपुर शहरातील विविध विकासकामांचे लोकार्पण व भुमिपुजन तसेच जिवती येथील विविध विकासकामांचे भुमिपुजन दि. 6 मार्च 2019 रोजी संपन्न होणार आहे.

मुल तालुक्यातील पेठगांव-राजोली-तांबेगडी मेंढा या रस्त्यावरील 10 कोटी रू. खर्चुन बांधण्यात आलेल्या मोठया पुलाचे लोकार्पण व 7.50 कोटी रू. किंमतीच्या राजोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे भुमिपुजन सकाळी 10 वाजता राजोली येथे संपन्न होणार आहे. यानिमित्ताने राजोली येथे जाहीर सभेला अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार संबोधित करतील.

दुपारी 12.30 वाजता जिवती येथील ग्रामीण रूग्णालयाचा पायाभरणी समारंभ तसेच विविध विकासकामांच्या भुमिपुजनाला ते उपस्थित राहणार आहे. सायंकाळी 5.30 वाजता बल्लारपुर शहरात 11 कोटी रू. खर्चुन बांधण्यात आलेल्या अत्याधुनिक बसस्थानकाचे लोकार्पण, शहरात बांधण्यात येणा-या 12.50 कोटी रू. किंमतीच्या ठोक भाजीमार्केट, मच्छी व मटन मार्केट तसेच नाटयगृहाजवळ वाहनतळ बांधकामाचे ई भुमिपुजन तसेच दिव्यांग बांधवांना सायकल वितरण समारंभास अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित राहणार आहे.

या कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहीर राहणार आहे. वनविकास महामंडळाचे अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, आमदार संजय धोटे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष देवराव भोंगळे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा बल्लारपुरचे नगराध्यक्ष हरीश शर्मा, उपाध्यक्षा सौ. मिना चौधरी, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. संध्या गुरनुले, जिल्हा परिषद सदस्य पृथ्वीराज अवताडे, शितल बांबोडे, पंचायत समिती मुलच्या सभापती सौ. पुजा डोहणे, उपसभापती चंदु मारगोनवार, मुलच्या नगराध्यक्षा रत्नमाला भोयर, उपाध्यक्ष नंदु रणदिवे, बल्लारपुर पंचायत समितीचे सभापती गोविंद पोडे, उपसभापती इंदिरा पिपरे, जिल्हा परिषद सदस्या सौ. वैशाली बुध्दलवार, ॲड. हरीश गेडाम, पंचायत समिती सदस्य सोमेश्वर पद्मगीरीवार, श्रीमती विद्या गेडाम आदींची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमांना नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थिती राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे